Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 351-354

DOI: 10.5281/zenodo.10128687

Original Research Article

# महात्मा गांधीची सत्य व अहिंसा संकल्पना

प्रा. शिवाजी सुभाष खिराडे

उच्च माध्यमिक शिक्षक, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,चाकूर,ता.चाकूर जि.लातूर ४१३५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sbk4@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

भारताला प्राचीन समृद्ध वारसा लाभलेला आहे. साहित्य, कला, संगीत, तत्वज्ञान, राजकीय, सामाजिक इ. क्षेत्रात भारतीय लोकांनी आपली एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा जतन केलेली आहे. भारतात विविध जातपंथ, रूढी, परंपरा, भाषा, धर्म यांचे वैविध्य आहे. अनेक सत्ताबद्द्ल भारतात झालेत आणि त्यामध्ये प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंत विविध परिवर्तन घडून आलेत. ब्रिटीशांचे भारतातील वर्चस्व काढून टाकण्यासाठी अनेक देशभक्तांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक प्रमुख नेते आणि तत्वज्ञ म्हणून महात्मा गांधी यांचे अलौकिक स्थान आहे. आपल्या सत्य, अहिंसा या तत्वांवर आधारित अहिंसात्मकरित्या भारतभूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा नवा मार्ग जगाला दाखविला. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम महात्मा गांधी यांना महात्मा ही उपाधी दिली.

महात्मा गांधी हे आपणांस सत्य, अहिंसा, त्याग, बलिदान, समाजसेवक इ. रूपात आपणांस परिचित आहेत. सत्य आणि अहिंसा यांचे पुजारी महात्मा गांधी भारताचे नव्हे तर संपूर्ण जगाचे श्रद्धास्थान आहेत. त्यांच्या विचारांचे क्षेत्र ही आकाशएवढे महान आहे. थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी गांधीजीविषयी आपले विचार व्यक्त करतांना म्हटले कि, “या जगात महात्मा गांधीसारखी अद्वितीय व्यक्ती होवून गेली, यावर पुढील पिढी विश्वास ठेवणार नाही.” या विधानावरून महात्माजींची योग्यता कळते. महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, समता, अस्पृश्यता निवारण, सामाजिक बांधिलकी, राजकारण, आश्रमव्यवस्था, सत्याग्रह, चळवळ, वृत्तपत्र, कौटुंबिक वातावरण इ. बाबतीत विचार मानवाला उत्तम जीवन जगण्यासाठी मार्गक्रम करतांना एक उत्कृष्ट वाटाड्या म्हणून आजही उपयुक्त आहेत.

महात्मा गांधी यांचे सत्य आणि अहिंसा याविषयीचे विचार कृती आणि अनुभव याद्वारे सांगितले आहे. महत्मा गांधी यांनी सत्याला आपल्या जीवनात मोलाचे स्थान दिले होते. सत्याचा मार्ग जरी संकटे आणि अडचणी निर्माण करणारा असला तरी जीवनाची परिक्रमा योग्य दिशेने झाल्याशिवाय राहणार नाही, यावर महात्मा गांधी यांचा ठाम विश्वास होता.

महात्मा गांधीनी आपल्या जीवनात सत्य, अहिंसा यांना अनन्यसाधारण महत्त्व दिले. त्यांच्या मते,"मानवाला जीवन जगण्यासाठी ज्या मुलभूत गरजांची पूर्तता करणे, जितके क्रमप्राप्त आहे. तितकेच सत्य आणि अहिंसा यांचे पालन करणेही अत्यावश्यक आहे. मानव आणि पशु यांच्यातील मुख्य भेद हा आत्मा आहे. प्रत्येक जीव सजीवामध्ये आत्मा आहे. परंतु मनुष्याला यांची जाणीव झालेली असते. म्हणूनच तो पशु व इतर सजीव यांच्यापेक्षा आपले वेगळे अस्तित्व निर्माण करू शकतो. सत्य आणि अहिंसा यांना आपण वेगवेगळे नाही करू शकत. या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. सत्याबरोबर अहिंसाही तेवढ्याच मोलाची आहे. सत्यप्राप्ती करण्यासाठी अहिंसा हे एक साधन आहे, तर सत्य हे साध्य अहिंसा मानवाने अंगीकाराबी आणि आपल्या संपूर्ण जीवनात याचा अवलंब करावा. ज्या गोष्टी आपल्या आवाक्यात आहेत त्यांना आपण साधन म्हंटले तर अहिंसा हे एक उत्तमप्रतीचे साधन आहे. हिंसा करावी किंवा नाही ह्याचा विचार मानव आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने करू शकतो. मानवाला सत्याचे आकलन करण्यासाठी अहिंसा हेच एकमेव साधन आहे. अहिंसेचा अंगीकार केल्यानंतर याचे अंतिम निर्णय सत्य हेच मिळते सत्याचा शोध घेण्यासाठी अहिंसा उपयुक्त ठरत नाही. क्षणिक समाधान प्राप्त करण्यासाठी मानवाला हिंसा योग्य वाटेलही पण अहिंसा ही मुळ सत्यप्राप्ती करून देणारे महत्त्वाचे साधन आहे. दैनंदिन जीवनात अहिंसेला कमालीचे महत्व असते. कारण अहिंसा हे साधन असल्याने तिची काळजी जास्त घेणे स्वाभाविक आहे. म्हणून गांधीजी म्हणतात कि, "मानवाला अहिंसेचे शिक्षण द्यावे लागेल, सत्याचे शिक्षण हा त्याचा परिपाक आहे. महात्मा गांधी अहिंसा याला देव मानतात तसेच सत्यालाही देव मानतात.

मानव हा आपल्या अस्तित्वापासूनच हिंसक होता. अगदी प्रारंभामध्ये तो नरमांस भक्षक होता, त्यानंतर पशुंचे मांस खाणे सुरु केले. या सर्व गोष्टीत हिंसा ही प्रमुख होती, पण त्यांचा ओढा अथवा कल हा अहिंसक किंवा हिंसा कमी होण्याच्या दिशेने जास्त होता. आपले भटके शिकारी जीवन जगतांना शेतीची सुरुवात केली आणि अन्न मिळविण्यासाठी तो जमिनीवर अवलंबून राहत असे. कालांतराने त्याने खेडी आणि नंतर शहर वसविली. मानव कुटुंबाचा भाग बनला. साहजिकच पुढे तो समाज आणि राष्ट्राचा अविभाज्य घटक झाला. ही सर्व प्रक्रिया हिंसा कमी होवून अहिंसा वाढल्याचे प्रतिक आहे. नाहीतर इतर काही जीवाप्रमाणेच मानव प्राणी सुद्धा नष्ट झाला असता. अहिंसा हि मानवाला मानवी मुल्यांच्या उच्चतम पातळीवर नेवून पोहचवितो. मानवाने आपल्या जीवनात सत्याची कास धरावी. असत्य कथन किंवा असत्य आचरण मानवाला अधोगतिकडे नेते, त्यामुळे मानवाला असह्य यातना सहन कराव्या लागतात.

अहिंसा याचा स्वीकार मानवाने सर्वप्रथम केला. हिंसा आणि अहिंसा यापैकी एकाची निवड करावयाची असल्यास मानवाने अहिंसेची निवड केली. अन्यथा फार कमी हिंसावादी मनुष्य यांचे अस्तित्व निर्माण झाले असते. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. इतर प्राणी यांच्याप्रमाणे हिंसेचा अवलंब मानव करतो. परंतु याला काही मर्यादा आहेत. सामाजिक जीवनाची वाटचाल करत असताना सर्वच ठिकाणी हिंसाच करता येणे शक्य नाही किंवा अहिंसा याचाच अवलंब करावा लागतो. हिंसा करणे ही क्रिया कोणालाही शिकवावी लागत नाही. नैसर्गिकरीत्या हिंसा ही मानवात व अन्य प्राण्यात उपजत असते. हिंसा कोणी करायला सांगितले म्हणून मानव करत नाही, तर पशुप्रमाणे मानवात आपले सामर्थ्य इतरांसमोर सिद्ध करावे, याची भावना निर्माण झाली की, मानव हा हिंसक व्हायला तयार होतो. अहिंसा या तत्वाचे पालन करणारा व्यक्ती कि, ज्यामध्ये अहंकार किंवा अहंमयकार याचा साधा लवलेशही अंगी असता कामा नये. भित्रा व भेकड मनुष्य हा अहिंसा या तत्वाला योग्य तो न्याय देवू शकत नाही. म्हणूनच अहिंसा हे तत्व मानवाला आपल्या अंगी निर्माण करता यावे, यासाठी महतप्रयास करावे लागतात. यासाठी आपल्या तत्वांची वा विचारांशी योग्य ती सांगड घालावी लागते. अहिंसेचे तेज मानव सहन करू शकत नाही. पण त्याचा साधा स्पर्श वा त्याची आपल्यात निर्माण झालेली छोटीशी लव हीदेखील संबंधित मानवाचे आयुष्य बदलते. परिणामत: सभोवतालचे जीवन पूर्ण बदल करण्याचे सामर्थ्य निर्माण होते. महात्मा गांधी म्हणतात की, " अहिंसा याचा स्वीकार करणारा व्यक्ती हा विनम्र असावा तसेच त्याच्या अंगी अहम् ची भावना नसावी. त्यामुळे मानव आपल्या उच्चतम मानवी मुल्यांची प्राप्ती करू शकतो.

अहिंसा आणि सत्ता यांचा तुलनात्मक दृष्टीने विचार केला तर अहिंसा ही सत्ता-स्पर्धा यासाठी अहिंसेचा उपयोग करून घेणे हे सर्वथा चूक आहे. कारण अहिंसेला एवढे मर्यादित स्वरूप नको असते. कारण अहिंसेचे स्वरूप व्यापक असल्याने ती सत्तेपेक्षा जास्त व्यापक प्रमाणात कार्य करू शकते. सरकारी यंत्रणा ताब्यात न घेता ती प्रभावीपणे सत्तेचे नियंत्रण व मार्गदर्शन करू शकते. म्हणजेच वास्तवाचा जर विचार केला तर हेच तिचे वैशिष्ट्य आहे. सत्याग्रहीचा हेतू अन्याय करणाऱ्यांची कुचंबना करण्याचा नसतो. त्याला भय दाखवायचा सुद्धा उद्देश नसतो, उद्देश असतो तो त्याच्या अंत:करणाला आवाहन करून सत्याग्रहाने त्यांचे मन कसे वळेल यासाठी प्रयत्न करण्याचा.

महात्मा गांधी म्हणतात की,"मानव आपल्या रोजच्या जीवनात आपली कार्ये करत असताना वेळोवेळी असल्याचा आधार घेताना दिसतो. प्रत्येक प्रसंगी सत्य किंवा असत्य हा विचार मनात येतो आणि मानव असत्याच्या आहारी जाण्याचा संभव जास्त आहे. मानव असल्याच्या आहारी गेल्यास तो अन्य फसव्या गोष्टीत सापडणे हा सत्याला झाकण्याचा मार्ग आहे असे गांधीजी मानतात. सत्य हेच परम आणि शाश्वत मुल्य आहे. सत्य किंवा इतर काही असे पर्याय नसावे, सत्य हे अंतिम आहे. सत्याशी इतर कोणतीही तुलना होवू शकत नाही. तडजोड ही सत्याच्या बाबतीत न करणे, या मतावर महात्मा गांधी ठाम आहेत. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती याप्रमाणे प्रत्येक मानव हा भिन्न आहे आणि त्याची विचारधारा सारखी नाही.

महात्मा गांधीनी आपल्या जीवनात सत्याला साध्य मानले आणि त्यासाठी आपल्या जीवनात नानाविध प्रयोग करून सत्यप्राप्ती केली. सत्य हे शाश्वत आणि चिरकाळ राहिले, याचा अर्थ मानवाने खोटे बोलू नये. असा आहे. सर्व प्रयोग त्यांनी आपल्या माझे सत्याचे प्रयोग यामध्ये व्यक्त केलेत. सत्याचे प्रकार सांगताना महात्मा गांधी म्हणतात की, सत्य हे दोन प्रकारचे आहे. १.सापेक्ष सत्य व २.निरपेक्ष सत्य जे सत्य परिस्थितीनुसार बदलते म्हणजेच कायमस्वरूपी नसते. याला गांधीजी सापेक्ष सत्य म्हणतात. सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनात सापेक्ष सत्याचा वापर केला जातो. व्यक्तीला दैनंदिन जीवनात कधी-कधी खोट्याचाही आधार घ्यावा लागतो, हे महात्मा गांधींना मान्य नाही. महात्मा गांधी यांचे असे म्हणणे आहे की, प्रत्येक व्यक्तीने आपला नैतिक व आत्मिक विकास करून सापेक्ष सत्याकडून निरपेक्ष सत्याकडे जाण्याचा प्रयत्न करावा. जे सत्य कायमस्वरूपी असते, निरंतर असते. सत्यम शिवम् सुंदरम् असे या सत्याची व्याख्या करून त्याला सच्चिदानंद संबोधतात. हे सत्य फक्त साधु आणि देवांना शक्य असु शकते.

अहिंसेसंबंधी महात्मा गांधी यांचे विचार स्पष्ट आहेत. त्यांच्या मते अहिंसेसाठी बाहेरून किंवा कोणत्याही प्रकारच्या बाहेरील शिक्षणाची आवश्यकता नाही अहिंसेसाठी फक्त मृत्युशी सामना करण्याचे धैर्य असावे लागते. अहिंसेवर फक्त प्रवचन दिले म्हणजे सर्व साध्य झाले असे मानणे सर्वथा चूक आहे. तर्ककठोर व वैश्विक धर्मावर जर अठळ श्रद्धा असेल तर माणूस कोणत्याही घटनेला सामोरे गेल्याशिवाय राहत नाही. असे करणे म्हणजे शुराची अहिंसा असे त्यांचे अहिंसे बद्दलचे मत आहे. माणसाला प्रेमाने जगता येते. कारण तो कसलीही अपेक्षा करीत नाही. प्रेमाला सदैव क्लेश सोसण्याचे माहिती असते. संतप्त होणे हा प्रेमाचा स्वभाव नाही. प्रेमाला सूड घेण्याची कल्पनासुद्धा शिवत नाही. प्रेमाचे महत्व सांगतांना महात्मा गांधी म्हणतात की,"जेथे प्रेम आहे, तेथे जीवन आहे." प्रेम नसणाऱ्या माणसाजवळ जर द्वेष असेल तर द्वेषाचा मार्ग विनाशाकडे जात असतो. म्हणूनच प्रेम ही जगातील सर्वात प्रभावी शक्ती आहे. एवढेच नाही तर ती सर्वात विनम्र स्वरुपाची शक्तीसुद्धा आहे. म्हणून महात्मा गांधी म्हणतात की, इतर कोणावरही वर्चस्व गाजवायला माझ्याजवळ प्रेमाखेरीज अन्य कोणतेही शस्त्र नाही. प्रेमाचे महत्व गाताना ते अत्यंत विनम्रपणे म्हणतात की," मी दृष्ट नाही, मी एक व्यवहारी ध्येयवादी आहे. हिंसा हा जसा पशूंचा धर्म तसा अहिंसा हा मानवाचा धर्म आहे. पशुमध्ये आत्मा सुप्त असतो व शारीरिक सामर्थ्यखेरीज अन्य धर्म त्याला ठाऊक नसतो. मानवाच्या प्रतिष्ठेमुळे त्याने याहून अधिक उच्च धर्माचे, आत्मबलाच्या धर्माचे पालन केले पाहिजे.

काही लोक असे समजतात की, अहिंसेच्या तत्वावर समाजाची संघटना किंवा धारणा करता येणार नाही. त्यांचे हे म्हणणे कितपत सत्यावर आधारित आहे, हे त्यांनाच माहित आहे. परंतु माझी स्वत:ची निश्चित मते आहेत. कुटुंबात वडील

उनाड मुलाला मारतात तेव्हा मुल बदला घेण्याचा विचार करीत नाही. मुल वडिलांचे ऐकते ते त्यांच्या माराच्या धाकाने नव्हे तर शिक्षेच्या मुलाशी आपल्यावरील त्यांच्या प्रेमाची भावना आपण दाखविली आहे. याची त्याला जाणीव होते. समाजाचे नियमन कशाप्रकारे होते किंवा व्हावे याचे हे आदर्श उदाहरण आहे. समाज हे एक मोठे कुटुंब असुन जी गोष्ट कुटुंबाच्या बाबतीत खरी आहे. ती समाजाच्या बाबतीत खरी असली पाहिजे, म्हणून माझा अहिंसेचा सिद्धांत ही एक अत्यंत प्रभावी शक्ती आहे. तेथे भिरुतेला किंवा दुर्बलतेलासुद्धा मुळीच स्थान नाही. हिंसक माणूस केव्हातरी अहिंसक होईल अशी आशा करता येईल. परंतु भेकड माणसाच्या बाबतीत मात्र अशी आशा बाळगता येणार नाही. म्हणून मी अनेक वेळा असे सांगितले आहे कि,"आपले स्वत:चे आपल्या महिलांचे व आपल्या पुजास्थानाचे रक्षण अहिंसेने कसे करावे हे आपल्याला माहित नसेल तर, आपण जर मर्द असु, तर निदान झगडून तरी या गोष्टींचे रक्षण आपल्याला करता आले पाहिजे."

"उद्याच्या जगात अहिंसेवर आधारलेली समाजरचनाच असली पाहिजे. याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही." असे म्हणताना महात्मा गांधीला अहिंसा ही संकल्पना किती जीवापाड प्रिय होती, हे लक्षात आल्यावाचून राहत नाही. तेव्हा ते संपूर्ण साम्राज्याला आव्हान देण्याचे धारिष्ट्य एका व्यक्तीच्या अंगी आणविणारी अहिंसा दुर्बल असुच शकत नाही. न मारता मरण्यासाठी लागणारे शौर्य हिंसेला लागत नाही. मात्र पलायनाहून हिंसा बरी असे त्यांचे मत आहे. भित्रेपणा व हिंसाचार या दोहोत निवड करताना ते हिंसाचाराची निवड करतात. स्वत:ची अप्रतिष्ठा करवून घेवून मानहानीचे जीवन जगण्यापेक्षा भारताने शस्त्रबळाचा वापर करावा नि त्यातून स्वातंत्र्य मिळवावे असे त्यांचे करारी मत होते. मात्र जेव्हा हिंसा व अहिंसा यामध्ये निवड करायची असते. तेव्हा त्यांना अहिंसा हिंसेपेक्षा सर्वोपरी श्रेष्ठ वाटते. क्षमाशीलता ही शिक्षा करण्यापेक्षा अधिक पौरुषमय वाटते परंतु त्याचवेळी ते हेही स्पष्ट करतात की, आक्रमणात अहिंसा नसते. कारण आक्रमणामागे सत्ताभिलाषा असते. म्हणून महात्मा गांधी अहिंसेला जास्त महत्व देतात, कारण अहिंसा ही शौर्याची चरमसिमा असते.

"अहिंसा परमो धर्म" याचा प्रत्यय आपल्याला महात्मा गांधी यांच्या संपूर्ण जीवनकाळात येतो. मानवाला जीवनाचे सार्थक करण्यासाठी अहिंसा आणि सत्य यालाच सर्वोपरी मानून याद्वारे जीवनयात्रा पूर्ण केली तर ते संकटमय वा संघर्षमय प्रवास असला तरी अंतिम ध्येयपूर्ती निश्चितच करता येईल. अहिंसेचे महत्व जगापुढे आपल्या वैयक्तिक पातळीवरून यापूर्वीच सॉक्रेटिस आणि येशू ख्रिस्त यांनी मांडले आहे. सत्य हे जगासमोर मांडताना आपल्या प्राणाची पर्वा न करता आपले विचार, तत्व आणि मुल्ये यांची जोपासना माणसाला करता आली पाहिजे. सत्याला नाकारता येणे हे सहज शक्य आहे. परंतु सत्य स्वीकार करताना अहिंसक राहून आपल्या विचारांवर ठाम असताना आपले प्राण त्यापुढे शुल्लक आहे, याची जाणीव व्यक्तीला परमप्राप्तीच्या दिशेने घेवून जाते. म्हणूनच महात्मा गांधी सत्य आणि अहिंसा यावरील विचार त्यांनी दिलेले आपल्या जीवनातील स्थान यांचा विचार आजच्या काळात मानवाने केला तर मानवी जीवन आणि त्यायोगे राष्ट्र उभारणी करणे शक्य होईल.

**संदर्भ सुची**

१. महाराष्ट्रातील समाजसुधारक- डॉ.एस.एस.गाठाळ- कैलाश पब्लिकेशन्स

२. भारतीय सामाजिक विचारवंत- डॉ.दा.धो.काचोळे- कैलाश पब्लिकेशन्स

३. भारतीय राजकीय विचारवंत- डॉ.शुभांगी राठी- कैलाश पब्लिकेशन्स

४. माझे सत्याचे प्रयोग- महात्मा गांधी